**P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad**
**Address:- Office Of The Commissioner Of Police ,**
**Premlok Park Chinchwad,**
**Maharashtra - 411033**

# प्रेसनोट दिनांक – ०८/०९/२०२४

**दि. ०७/०९/२०२४ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे**

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

**०१.**

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | वाकड ९६७/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम १०९,११८(२),११८(१), ३(५),आर्म ॲक्ट ४,२५,महाराष्ट्र पोलीस अधिनियम ३७(१)(३) सह १३५,सह क्रिमीनल लॉ ॲमेडमेन्ट ॲक्ट कलम ३,७ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०६/०९/२०२४ रोजी २३.३० वा चे सुमारास शिवराजनगर,लेन नंबर ०१,रहाटणी, काळेवाडी पुणे येथे फिर्यादी यांचे वर्कशॉपचे समोरील रोडवर |
| गुन्हा दाखल | :- | दि ०७/०९/२०२४ रोजी १३.४४ वा |
| फिर्यादी | :- | विशाल नथु गायकवाड, वय ३० वर्षे,व्यवसाय पावडर कोटींग वर्कशॉप, रा. साई कॉलनी, हिमालय अपार्टमेंटच्य बाजूला रहाटणी,पुणे |
| आरोपी | :- | १)किशोर पांचाळ वय २० वर्ष रा. गजानन नगर, कॉलनी क्र.डी, साईबाबा मंदिरासमोर, रहाटणी, काळेवाडी, पुणे २)करण ऊर्फ मुन्ना गजानन चोपवाड वय अंदाजे २४ वर्ष रा.शिवराज नगर,गल्ली नंबर ०३,रहाटणी पुणे **आरोपी क्र.०१ अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी हे त्यांचे वर्कशॉपसमोर टेम्पो पार्क करुन टेम्पोतुन खाली उतरुन फिर्यादी यांचे ओळखीचे त्यांचे शॉपचे शेजारील शॉपमध्ये कामास असलेले कामगार महादेव मरीअप्पा येतिमनी व लिंगा शिवाप्पा कटमनी बोलत थांबलो असता फिर्यादी यांचे ओळखीचे इसम नमुद आरोपी यांनी येवुन फिर्यादी यांचे जवळ येवुन ‘‘आमच्या अंगावर चिखल का उडवला’’ असे विचारुन फिर्यादीचे काहीही न ऐकता आरोपी क्रं २ याने फिर्यादीस ‘‘तुला लय माज आला आहे का, तुला आज संपवुनच टाकतो’’ असे म्हणुन त्याचे कमरेला लावलेला लोखंडी कोयता काढुन फिर्यादीस जीवे ठार मारण्याच्या उददेशाने त्यांचे डोक्यावर वार केला असता तो त्यांनी चुकविला परंतु त्याने फिर्यादीचे उजव्या खांदयाचे वर पाठीमागील बाजुस वार करुन गंभीर जखमी करुन जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला,तसेच क्रं १ याने त्याचे हातातील लोखंडी रॉडने फिर्यादीचे डोक्यावर मारत असताना त्यांनी त्यांचा उजवा हात मध्ये केल्याने उजव्या बोटावर मारुन मला जखमी केले आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि व्यंकट पोटे, . ९७६६२६४२६६ |

**०२.**

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | रावेत ३३९/२०२४ भा.न्या.संहीता २०२३ चे कलम -१०९,११५(२), ३५२,३५१(२),१८९(२) १८९(४),१९१(२),१९१(३),१९०, क्रिमीनल लॉ अमेडमेंट कलम ३, ७ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०७/०९/२०२४ रोजी ११.३० वा. ते १२.१५ वा. चे दरम्यान पुना व्हिले सोसायटी पुनावळे पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि. ०७/०९/२०२४ रोजी २२.३२ वा. |
| फिर्यादी | :- | मोहम्मद अश्रफ मोहम्मद शफी, वय २७ वर्षे व्यव- नोकरी रा. फरांदे बिल्डर यांचा लेबर कँम्प पुणा व्हिले सोसायटीच्या शेजारी पुनावळे पुणे मुळ गाव- तुली जि.मोहोर राज्य जम्मु कश्मीर |
| आरोपी | :- | १) मारुती परसराम वराडे, वय २०, धंदा.नोकरी, रा - आर ६, कोलतेपाटील, चव्हाणवस्ती, जांबे पुणे, कवटीकमळेश्वर ता संगमनेर,२) केदार जितेश बनसोडे, वय १९, धंदानोकरी, रागणेशमंदिर, डांगेचौकजवळ, वाकड, पुणे. मुपो औसाता औस जि लातुर.३) गोपाल सिदेश्वर बोरावडे, वय २६, धंदानोकरी, रा अतुलनिर्माण सो, अ/१०८, पांढरे वस्ती, पुनावळे, पुणे. मुळगांव - मुपो भाटसांगवी, ता जि बीड४)प्रियंकसिंग सुरेंद्रसिंग तोमर, वय २३, धंदानोकरी, रा - हॅलो वर्ल्ड हिल साईड, रु नं १०५, फेज ३, हिंजवडी, ता मुळशी, जि पुणे. मुळगांव - मुपो ६/७, राधागंज, यशोदा अपार्टमेंट पाठीमागे, |

देवास, मध्यप्रदेश.५) रजाक इर्शाद खान, वय २५, नोकरी, रा एच नं १६९, श्रीकृष्ण नगर, देहुरोड, पुणे
६) सुनिलविठठल गवळी, वय २०, नोकरी रा- रसिकवाडी, जांबे, ता मुळशी जि पुणेकेसापुरकॅम्प माजलगांव, बीड
७)राहुल गोपाळ बोरवडे८)सुनिल सिदधु बोधणे, वय २०, धंदानोकरी, रा मामुर्डी, ता मावळ, जि पुणे. मुपो बसव कॉलनी, ता बसवकल्याण, जि बिदर, राज्यकर्नाटक.व त्यांचे इतर चौदा ते पंधरा साथीदार **आरोपी क्रं १ ते ६ व ८ अटक आहे विधीसंघर्षित बालक-२**

| | | |
|---|---|---|
| तपशिल | :- | नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील झेप्टो कंपनीचे डिलेव्हरी बॉईज आरोपी क्रं १ यास फिर्यादी यांनी सोसायटीचे पॅसेंजर लिफ्ट चा वापर न करता सर्विस लिफ्टचा वापर करणेसाठी सांगितल्याने आरोपी क्रं १ याने चिडून जावुन फिर्यादीस ‘‘तुम रूको और देखना हम क्या करते है’’ असे धमकी देवुन निघुन गेला व काही वेळाने झेप्टो कंपनीचे त्याचे पंधरा ते वीस साथीदार डिलेव्हरी बॉईज यांना आठ ते दहा मोटार सायकलवर घेवुन येवुन आरोपी क्रं १ हा फिर्यादीस म्हणाला की, ‘‘आज याला संपवुनच टाकतो.’’ असे म्हणुन आरोपी क्रं १ व २ या दोघांनी फिर्यादीस जिवे मारण्याच्या उद्देशाने फिर्यादीचे डोक्यात लाकडी दांडक्याने मारहाण करून फिर्यादीस गंभीर जखमी केले. तसेत त्यांचे इतर पाच ते सहा साथीदारांनी फिर्यादी यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. भांडणे सोडविण्यासाठी आलेले आमचे सुपरवायजर प्रभाकर पांडे यांना दगडाने, लाथाबुक्क्यांनी व एरिया सुपर वायजर ज्ञानदेव भोगील व सेक्युरिटी गार्ड मेहबुब शेख यांना देखील पंधरा ते वीस मुलांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण केली आहे. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोलीस उपनि;रीक्षक श्री राहुल खिळे मो.नं -९०२१४२७४६४ |

०३.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चिखली ५१३/२०२४ भारतीय न्याय संहिता सन २०२३चे कायदा कलम. ३१६(२), ३१८(४), |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०६/०६/२०२४ रोजी ते दिनांक ०६/०९/२०२४ रोजी दरम्यान.फिर्यादीचे राहते घरात फ्लॅट नं.०६ वनश्री हौसीग सोसायटी कृष्णानगर चिचचड पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दिनांक ०७/०९/२०२४ रोजी ०४/१० वा |
| फिर्यादी | :- | सुरज बलभीम जमधडे वय ३७वर्षे,व्यवसाय नोकरी, रा.फ्लॅट नं.०६ वनश्री हौसीग सोसायटी कृष्णानगर चिचचड पुणे मुळ गांव वाघोली जमधडे वस्ती ता.शेवगांव जि.अहमदनगर |
| आरोपी | :- | टिआरपीएफच्या ॲप वरिल व मोबाईल नं.८४२०८९७०८१ यावरील अज्ञात इसम नांव व पत्ता माहीत नाही नांव व पत्ता माहीत नाही. **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारखेस वेळी व ठिकाणी फिर्यादी यांना सिरी मार्केट या शेअर मार्केटच्या व्हॉट्सअप ग्रुपवर ट्रेडिग करताना जास्त लांभाश देण्याचे व नुकसान होत असेल तरीही त्यांची भरपाई देवु असा फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन फिर्यादी यांना टिआरपीएफ टोकन ट्रेडिग ॲप डाऊन लोड करण्यास सांगुन त्यानंतर फिर्यादीस ग्रोथ गुरुस नेटवर्क ई११७ या व्हॉट्सॲप ग्रुपवर ॲड करुन मोबाईल नंबर नं.८४२०८९७०८१ यावरुन त्या ग्रुपमध्ये वेगवेगळया बॅक खाते नंबरवर फिर्यादी यांना पैसे भरण्यास सांगुन पैसे भरल्यानंतर टिआरपीएफ टोकन ट्रेडिग या ॲपवर युएस डॉलरव्दारे जास्त नफा झाल्याचे भासवुन फिर्यादी यांना आणखी वांरवार वेगवेगळया बँक खाते नंबरवर पैसे भरण्यास सांगुन फिर्यादी यांची ४८,६१,४००/-इतक्या रक्कमेचा अपहार करुन फिर्यादीची फसवणुक केली आहे.म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनिरी देवकुळे ९१५६२०३५६७ |

०४.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | दिघी ३७५/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम २८१, १०६(२), ३२४ (४)(५) व मो. वा. का कलम १८४, ११९/१७७, १३२(१) (क). |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि. ०६/०९/२०२४ रोजी १६.०० वा.चे सुमारास एआयटी कॉलेजच्या पुढे बोपखेल दिघी सार्वजनिक रोडवर |
| गुन्हा दाखल | :- | दि.०७ /०९/२०२४ रोजी १५/२० वा |
| फिर्यादी | :- | गोपीचंद सत्यवान हुलावळे, वय ४४ वर्षे, धंदा. नोकरी, रा. घर नंबर ६७४, साईनाथ चौक, फुगेवाडी, पुणे - १२. मो. नं. ९९६०७५६९६९ |
| आरोपी | :- | अज्ञात वाहनावरील चालक |
| तपशिल | :- | नमुद तारखेस वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचा भाऊ नामे अमोल सत्यवान हुलावळे, वय ४० वर्षे, घर नंबर १६४, साईनाथ चौक, फुगेवाडी, पुणे - १२. हा दि. ०६/०९/२०२४ रोजी त्यांचेकडील मरुम रंगाची टीव्हीएस ज्युपिटर क्रं. एम.एच.१४/ जी.जी.३६५० हिचेवरुन त्याचे ऑफिस वरुन विश्रांतवाडी पुणे बोपखेल दिघी मार्गे च-होली पुणे कडे जात असताना एआयटी कॉलेजच्या पुढे बोपखेल दिघी रोडवरुन जात असताना त्यांना अज्ञात वाहनावरील चालकाने धडक देवुन त्यांचे डोक्यास, हातास, छातीस व इतर ठिकाणी गंभीर जखमी करुन व गाडीचे नुकसान करुन त्याचे मृत्युस कारणीभुत झाला आहे.तसेच तो अपघाताची खबर ने देता पळून गेला आहे. म्हणून |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | ए.एम.शिंगारे, पोलीस उपनिरीक्षक, ८६६९०९१०३९ |

०५.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | तळेगाव दाभाडे ३८०/२०२४ भारतीय हत्यार कायदा कलम ३(२५) महाराष्ट्र पो अधिनियम क ३७(१), (३)सह १३५ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि ०७/०९/२०२४ रोजी ००.०५ वा चे सुमारास मौजे गहुंजे गावच्या हददीमध्ये एम सी ए क्रिकेट स्टेडीयमकडे जाणारे रोडलगत तळेगाव दाभाडे |
| गुन्हा दाखल | :- | दि.०७/०९/२०२४ रोजी ०५.४४ वा |
| फिर्यादी | :- | गणेश गजानन मालुसरे पोहवा १६०८ वय ३८ वर्षे नेम गुन्हे शाखा युनिट ५ पिंपरी चिंचवड आयुक्तालय |
| आरोपी | :- | लखन ऊर्फ निखील बाळु आळगे वय २५ वर्षे रा एम बी कॅम्प पाण्याच्या टाकीजवळ देहुरोड ता हवेली जि पुणे **आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील आरोपी याने सुमारे ४०,०००/- रुपये किंमतीचे एक देशी बनावटीचे पिस्टल व २०००/- रुपये किंमतीच्या दोन जिवंत पितळी रंगाचे काडतुस अनाधिकाराने विनापरवाना बेकायदेशीर जवळ बाळगले असताना मिळुन आला म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि खामगळ ९५६१०६५८८१ |